# कार्यालय नागपूर, महानगरपालिका नागपूर.
## शिक्षण विभाग

शिक्षण विभाग (माध्यमिक)
म.न.पा.केंद्रीय कार्यालय
सिव्हील लाईन्स,नागपूर -०१.

दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५६११३३, २५६७०२८
E-mail Id- education.nmc@gmail.com

जा.क्र. 351 ~~दि.२०.६.२०१४~~
04.09.2014

प्रति,

मुख्याध्यापक/ मुख्याध्यापिका,
सर्व प्राथमिक / माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

विषय:- ऊर्जा संवर्धन या विषयावर आधारित शालेयस्तरीय , राज्यस्तरीय व राष्ट्रीयस्तरीय चित्रकला स्पर्धा आयोजित करणेबाबत.

ऊर्जा बचती विषयीची जाणीव शालेय विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांमध्ये व्हावी या उद्देशाने ऊर्जा मंत्रालय ,केंद्र शासन यांनी इयत्ता चौथी ,पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गट 'क' तसेच सातवी,आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांसाठी गट 'ख' नुसार वर्गवारी करून ऊर्जा बचतीवर आधारित खालील राज्यस्तरीय व राष्ट्रीयस्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | गट - 'क' | गट - 'ख' |
|---|---|---|
| १ | ऊर्जा वाचवा , भविष्य सुरक्षित करा.<br>(Save Energy , Secure Your Future ) | ग्लोबल वॉर्मिंग आहे ग्लोबल वॉर्निंग<br>(Global Warming is Global Warning) |
| २ | उज्वल भविष्यासाठी ऊर्जा संरक्षण.<br>(Conserve Energy for Brighter Future ) | हे योग्य प्रकारे करा, आपला प्रकाश बदला.<br>( Make it Right,Change Your Light) |
| ३ | वीज वाचवा , प्रकाश वाढवा.<br>(Bijli Bachao, Prakesh Badhao ) | ऊर्जा बचत संस्कृतीचा करा विकास,उज्वल होईल भविष्य आणि घरोघरी प्रकाश.<br>( Urja Bachat ki Sanskritika Kare Vikas, Ujwal Hoga Bhavishya Aur Ghar Ghar Prakash) |

प्राथमिक तसेच माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी ही स्पर्धा आयोजित करून आयोजकांच्या पत्त्यावर त्यांच्या मार्फत निवड झालेली दोन उत्कृष्ट चित्रे २५ सप्टेंबर ,२०१४ पूर्वी पाठवायची आहेत. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभागी झाल्याबद्दल आयोजकांमार्फत प्रशस्ती पत्रक देण्यात येणार आहेत.

शालेयस्तरावरील ५० उत्कृष्ट चित्रांची निवड करून राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी विद्यार्थ्यास प्रत्यक्ष स्थळावर चित्र काढण्यासाठी दि.१५ नोव्हेंबर २०१४ रोजी बोलाविण्यात येईल.यासाठीचा विद्यार्थ्यांचा व दोन पालकांचा प्रवास खर्च व प्रत्येक विद्यार्थ्यास रू.१०००/- आयोजकामार्फत अदा करण्यात येईल.

राज्यस्तरावरील पहिल्या ,दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या पारितोषिक विजेत्यांस राष्ट्रीय स्तरावर स्तरावर चित्रकला स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बोलाविण्यात येईल. सदर स्पर्धा दिल्ली येथे दि.१२.१२.२०१४ रोजी घेण्यात येईल. विद्यार्थ्यास व दोन पालकांस निवास व रेल्वेच्या स्लिपर क्लासने प्रवासाचा खर्च व प्रत्येक विद्यार्थ्यास रू.१०००/- आयोजकामार्फत अदा करणेत येईल. बक्षिसाची रक्कम पुढीलप्रमाणे राहील.

राज्यस्तरीय पारितोषिके

| अ.क्र. | पारितोषिक | गट - 'क' | गट - 'ख' |
|---|---|---|---|
| १ | प्रथम | रू.२०,०००/- | रू.२०,०००/- |
| २ | द्वितीय | रू.१५,०००/- | रू.१५,०००/- |
| ३ | तृतीय | रू.१०,०००/- | रू.१०,०००/- |
| ४ | उत्तेजनार्थ (दहा पारितोषिके) | प्रत्येकी रू.२५००/- | प्रत्येकी रू.२५००/- |

राष्ट्रस्तरीय पारितोषिके गट - 'क'

| अ.क्र. | पारितोषिक | पारितोषिक संख्या | पारितोषिक रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रथम | १ | रू.१,००,०००/- |
| २ | द्वितीय | ४ | रू.५०,०००/- |
| ३ | तृतीय | ८ | रू.२५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | उत्तेजनार्थ | १० | रु.१०,०००/- |

गट - 'ख'

| अ.क्र. | पारितोषिक | पारितोषिक संख्या | पारितोषिक रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रथम | १ | रु.१,००,०००/- |
| २ | द्वितीय | ४ | रु.५०,०००/- |
| ३ | तृतीय | ८ | रु.२५,०००/- |
| ४ | उत्तेजनार्थ | १० | रु.१०,०००/- |

विजेत्यास राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन १४ डिसेंबर २०१४ निमित्त आयोजित समारंभास मान्यवरांच्या हस्ते नवी दिल्ली येथे पारितोषिक प्रदान करण्यात येतील. या स्पर्धेबाबतच्या नियम,अटी व शर्तींची सविस्तर माहिती संकेतस्थळ **www.beeindia.in** व **www.energymanagertraining.com** यांच्यावर दिलेली आहे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर